जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४६ दिनांक - २६/१२/२०२४**

अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर

## गांजा विक्री करणा-या इसमास केली अटक

दि.२५/१२/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील अधिकारी व अंलदार असे गुन्हे प्रतिबंधात्मक, तसेच अंमली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना त्यांना मिळालेल्या माहितीनुसार एक इसम शिवशंभो स्नॅक सेंटर च्या शेजारी बंद पत्र्याचे शेडलगत असलेल्या सार्वजनिक मोकळे जागेत, लोहगांव पुणे या ठिकाणी हातामध्ये पांढऱ्या रंगाची नायलॉनची पिशवी घेवुन संशयीतरित्या कोणाची तरी वाट पाहत आहे.

तात्काळ सदर ठिकाणी जाऊन उभा असलेल्या सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **आकाश तुकाराम जाधव,वय-२३ वर्षे रा. के/ऑफ किशोर माने, शिवशंभो स्नॅक सेंटर,भारतमाता नगर,लोहगांव,पुणे मुळगांव मु.पो.किंगगांव जेट्टु,देवानगर ता.लोणार जि.बुलढाणा.**असे असल्याचे सांगितले त्यानंतर त्याची व त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये एकुण २१,३२०/- कि.चा ऐवज त्यामध्ये १६,३२०/- रु.कि.चा ८१६ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ, ५०००/- एक मोबाईल हॅण्डसेट व ००.००/-कि.चे छोटया ४६ प्लॅस्टीकच्या पारदर्शक पिशव्या असा ऐवज अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्याचे विरुध्द विमानतळ पोलीस ठाणे गु.र.नं. ६७७/२०२४ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरील नमुद कारवाई ही मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे १ श्री गणेश इंगळे यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम,सहा.पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे,पोलीस अंमलदार सुजित वाडेकर,ज्ञानेश्वर घोरपडे,विशाल दळवी,विनायक साळवे,संदिप शिर्के,प्रविण उत्तेकर,दत्ताराम जाधव,विपुल गायकवाड,रेहाना शेख यांनी केली.